# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/जिपपंस/२०११/प्र.क्र.१९/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ०४/०२/२०१२

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)
(मुंबई जिल्हा व उपनगर, धुळे, नंदूरबार,
अकोला, वाशिम, भंडारा व गोंदिंया वगळून)

विषय :- जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुका-२०१२.
मतमोजणीचा दिनांक व निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

राज्यातील २७ जिल्हापरिषदा व त्या अंतर्गत असलेल्या ३०९ पंचायत समित्यांकरिता राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाचे पत्र दि. ३ जानेवारी, २०१२ व (गडचिरोली जिल्ह्यासाठी) ११ जानेवारी, २०१२ रोजीच्या आदेशाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. या कार्यक्रमानुसार गडचिरोली जिल्हा वगळता इतर २६ जिल्हयातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकीची मतमोजणी दि.८/०२/२०१२ रोजी व गडचिरोली जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांची मतमोजणी दि.१४/०२/२०१२ रोजी घेण्यात येणार होती.

तथापि, राज्यातील १० महानगरपालिकांकरिता दि. १६ फेब्रुवारी, २०१२ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. जिल्हा परिषद व महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये फारसा कालावधी नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा निकाल पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार घोषित झाल्यास त्याचा प्रभाव महानगरपालिकेच्या मतदानावर आणि पर्यायाने निकालांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हि बाब विचारात घेऊन १० महानगरपालिका व २७ जिल्हा

परिषदा, ३०९ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची मतमोजणी एकाचवेळी म्हणजे दि. १७ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतलेला आहे. त्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांकरिता मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतचा कार्यक्रम खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. सुधारीत कार्यक्रमास नियमानुसार प्रसिध्दी देण्यात यावी.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | निश्चित केलेला दिनांक |
|---|---|---|
| १ | २७ जिल्हा परिषद व ३०९ पंचायत समिती निवडणुकीच्या मतमोजणीचा दिनांक | शुक्रवार, दि.१७ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी १०.०० वा. पासून |
| २ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करणे | बुधवार , दि.२२ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( डॉ.अशोक कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\d-7\zpps ele 2012 doc/mahale